# स्वारस्याची अभिरुची

## जाहिर सुचना फेर सादर (व्दितीय वेळ)

जावक क्र. वविशम/वैआवि/ १२०३ /२०२३ दि. ११/०९ /२०२३

सर्व इच्छुक व्यक्ती/संस्था/विकासक/ठेकेदार यांना कळविण्यात येत आहे की, महापालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत नव्याने चालू करणेत येणाऱ्या रुग्णालयाचे आंतर व बाहय संरचना डिझाइन करणेसाठी स्वारस्याची अभिरुची (E.O.I) खालील अटी-शर्तीवर दि. २०/०९/२०२३ रोजी ५.०० वा पर्यंत मागविण्यात येत आहे.

**कामाची व्याप्ती:-**

१. संबंधित संस्था/व्यक्ती यांनी नवीन रुग्णालय बांधणे अंतर्गत (अपघात विभाग, ओ.पी.डी विभाग, आय.पी.डी विभाग, शस्त्रक्रिया विभाग, औषध विभाग, सोनोग्राफी व एक्स-रे रुम, प्रयोगशाळा, प्रशासन विभाग, ऑक्सिजन प्लॉट, सेवा क्षेत्र जसे आर.ओ, वॉशिंग/ड्राईग क्षेत्र, इ.टी.पी/एस.टी.पी प्लॉट इ.) व्यवस्थाचे डिझाईन/आरेखन करुन देणे बंधनकारक राहील.

२. संबंधित संस्था/व्यक्ती यांनी जुन्या/अस्तिवातील रुग्णालयात (अपघात विभाग, ओ.पी.डी विभाग, आय.पी.डी विभाग, शस्त्रक्रिया विभाग, औषध विभाग, सोनोग्राफी व एक्स-रे रुम, प्रयोगशाळा, प्रशासन विभाग, ऑक्सिजन प्लॉट, सेवा क्षेत्र जसे आर.ओ, वॉशिंग/ड्राईग क्षेत्र, इ.टी.पी/एस.टी.पी प्लॉट इ.) व्यवस्थाचे डिझाईन/आरेखन करुन देणे बंधनकारक राहील.

**पुर्व पात्रता:-**

१. संबंधित संस्था/व्यक्ती हे व संस्थेतील तज्ञ कर्मचारी (बी.ई/एम.ई सिव्हिल, बी. आर्किटेक्चर/एम. आर्किटेक्चर व त्या पुढील शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक राहील.

२. वास्तुविशारद/नियोजनकार संस्था असल्यास त्यांचेकडे कार्यरत अभियंते, वास्तुविशारदक/आरेखनकार यांची यादी देणे बंधनकारक राहील.

३. संबंधित संस्था/व्यक्ती यांनी कामाची व्याप्ती यात नमूद अंतर्गत व बाहय संरचना डिझाईन या क्षेत्रात किमान ३ वर्षे अनुभव तसेच शासकिय/खाजगी रुग्णालयाचे किमान ५० बेड आय.पी.डी, ओ.पी.डी व अन्य आंतररुग्ण विभागांसह निर्माण केल्याचा अनुभव दाखला देणे बंधनकारक राहील.

४. संयुक्त संस्था असल्यास रुग्णालय उभारणी व रुग्णालयातील ओ.पी.डी व अन्य आंतररुग्ण आरेखन केलेल्याचे किमान ३ वर्षाचा अनुभव दाखला देणे बंधनकारक राहील.

५. खाजगी संस्थांनी त्यांचे आय.टी.आर व जी.एस.टी शासनास भरणा केल्याचे तसेच अन्य लागू शासकीय नोंदणी प्रमाणपत्र/कागदपत्र सादर करणे आवश्यक राहील.

६. सदर काम करताना कोणताही अपघात घडून जीवित अथवा वित्त हानी झाल्यास त्यास संबंधीत संस्था/व्यक्तीची जबाबदार राहील.

७. सदर कामकाज उप-आयुक्त (वैद्यकिय) व प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली करणे आवश्यक राहील.

८. सदर स्वारस्याची अभिरुची दिनांक २०/०९/२०२३ रोजी सायं ५.०० वा. पर्यंत उपायुक्त (वैद्यकिय) वसई विरार शहर महानगरपालिका यांच्याकडे सिलबंद लखोटयात सादर करणे आवश्यक राहील.

(डॉ. विजयकुमार द्वासे)
उपायुक्त (वैद्यकिय)
वसई विरार शहर महानगरपालिका